नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०९/०६/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

## १७ वर्षीय मुलीवर अतिप्रसंग, आरोपी पोलिसांच्या अटकेत

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत मौजा श्री साई नगर गुजरखेडी सावनेर दिनांक १५/०८/२०२० चे १२.००वा. ते दि. ०६/०६/२०२२ चे ११.०० वा. चे सुमारास वय १७ वर्षीय पीडित/फिर्यादी मुलीला आरोपी नामे— राजा संतोष फुले, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ श्री साई नगर, सावनेर याने पीडित मुलीचा तिचे अल्पवयीन असल्याचा व आजानतेपणाचा फायदा घेवून माहे सप्टेंबर २०१९ पासुन तिचेशि मैत्री करून प्रेम संबंध ठेवले. त्यानंतर आरोपीने पीडितेस त्याचे घरी बोलावून दि. १५/०८/२०२० रोजी दुपारी १२.०० वा. तिचेशी शारीरिक संबंध केले. तसेच तिच्या गळयात हार घालून पीडितेला त्याची पत्नी झाल्याचे म्हणाला व फोटो काढले त्यावर धमकी देवून दोन तिन वेळा त्याने त्याचे घरातील बेडरूम मध्ये बळजबरीने शारीरिक संबंध केले. तसेच दि. ०६/०६/२०२२ रोजी ११.०० वा. पीडितेचे गळयात हार घलतांना फोटो व बदनामी कारक मॅसेज फेसबुकचे अकाउंटवर टाकून तसेच वॉटस ॲप ला ठेवून त्याने पीडितेची समाजात बदनामी करून तिचे वडीलास शिविगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(२)(जे),३७६(२)(एन),३७६(३),३५४ए,३५४डी,५००,५०४,५०६ भादवी, सहकलम ४,५(एल) बालकांचे लैंगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२, सहकलम बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ कलम ३, १० कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि प्रियंका गेडाम मो.नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत दहेगाव रंगारी येथे दिनांक ०७/०६/२०२२ चे २२.०० वा. ते २२.३० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १७ वर्षीय ही आपले परिवारासह राहते. आरोपी नामे— अक्षय चदंन करनाके, वय २७ वर्ष, रा. दहेगाव रंगारी हा घटना वेळे पूर्वी १५ दिवसा अगोदर पीडिता/फिर्यादी हिचे राहते घरी दारू पिवून गेला होता. त्यावेळेस फिर्यादी ही आपले मोठया आईच्या घरी गेली होती. तेव्हा आरोपीने फिर्यादीच्या आईला पिण्याकरीता पाणी मागितले असता फिर्यादीचे आईने त्याला दारू पिवून असल्याने पाणी न देता परत पाठविले होते. दिनांक ०७/०६/२०२२ रोजी फिर्यादी ही रात्री २१.०० वा. चे सुमारास आई व भावासह दहेगाव रंगारी येथील आठवडी बाजारा करीता गेली होती. आठवडी बाजार झाल्यानंतर तिची आई घरी निघून गेली. यातील फिर्यादी/पीडिता ही पानीपूरी खाण्याकरीता भावासह थांबली पाणीपूरी खाल्यानंतर ति घरी परत जात असतांना आरोपी हा मागून येवून पीडिताचा पाठलाग करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यावर पीडिता हिने त्यास एक चप्पल मारीन असे म्हणून हात झटकून घरी निघून गेली. तरी आरोपीने फिर्यादीचा पाठलाग करून तिला अश्लिल बोलुन तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ३५४(ड) भादंवी. सहकलम ८, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि लक्ष्मी मलकुवार, पोस्टे. खापरखेडा (पोस्को पथक) मो. क्र.९६२३६८७६२७ या करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. काटोल –** दिनांक ०१/०५/२०२२ चे ११.०० वा. ते दिनांक ०८/०६/२०२२ चे १०.३० वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– आनंद रामराव बोरकर, रा. वडविहीरा याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि पुनम कोरडे मो.क्र. ७२७६३३०४५५ या करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. मौदा:–** फिर्यादी नामे– सौ. प्रिया अतुल शिंगने, वय २२ वर्ष, रा. नवकन्या नगर भरतवाडा नागपूर, ह.मू जाखेगाव ता कामठी व आरोपी नामे– १) पति– १) अतुल लक्ष्मण शिंगने नवकन्या नगर भरतवाडा नागपूर, ह.मू जाखेगाव ता कामठी हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत ४० कि.मी. अंतरावर नवकन्या नगर भरतवाडा नागपूर, ह.मू जाखेगाव ता कामठी येथे दिनांक २१/०२/२०२२ ते दिनांक ०५/०६/२०२२ चे ००.०० वा. ते ०८.३० वा. पर्यंत आरोपी नामे– १) अतुल लक्ष्मण शिंगने, २) लक्ष्मण शंकर शिंगने, ३) सुनिता लक्ष्मण शिंगने व ४) सौ. सुवर्णा रोशन वानखेडे सर्व रा. नवकन्या नगर भरतवाडा नागपूर यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४९८, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**